# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०२/२०२५ (शुक्रवार) सकाळ**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयातुन रेकॉर्ड वरील आरोपीला केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी,मौदा यांनी गुन्हेगार नामे ढेमन भैय्यालाल तांडेकर ,वय ५५ वर्षे,रा तांडा,ता. मौदा जि. नागपुर याला ३ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**ढेमन भैय्यालाल तांडेकर ,वय ५५ वर्षे,रा तांडा,ता. मौदा जि. नागपुर** याचे विरूध्द पोलीस स्टेशन आरोली येथे सन २०१८ पासुन अवैध दारू विक्री करणे ,तसेच बाळगणे असे गुन्हे दाखल आहे. त्याच्यावर सतत कार्यवाही करून सुध्दा त्याच्या वतवणुकीमध्ये कोणताही बदल झाला नाही. तसेच तो स्वत:ला नामी गुंड असल्याबाबत सांगुन लोकांच्या मनामध्ये दहशत व भय निर्माण करून विनापरवाना हातभट्टी गाळतो तसेच गावठी हातभट्टीची दारू विकतो. सदर इसमामुळे नागरिकांच्या मनात असुरक्षीततेची भावना निर्माण झाली असुन तो नागरिकांच्या मनात दहशत निर्माण व्हावी या हेतुने तो परीसरातील लोकांना अश्लिल शिवीगाळा करून मारण्याची धमकी देतो. त्याच्या कृत्याने शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा **महाराष्ट्र पोलीस कायदा कलम कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार** करण्याचा प्रस्ताव पोलीसांनी **उपविभागिय दंडाधिकारी ,मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून** आरोपीला **३ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण** येथुन हद्दपार केले आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर